# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक २९ जून, २०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : सभापती, म.वि.प. नियम ७ अन्वये उप सभापतींच्या निवडणुकीसंबंधातील कार्यक्रमाची घोषणा करतील.**

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)** : "महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक लेखे व महालेखापाल (लेखापरिक्षा-१) महाराष्ट्र यांचा स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील महामंडळाचे अनुपालन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(१) श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे येथे खोट्या नोकऱ्यांचे आमिष दाखवून बेरोजगार तरुणांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणारी मोठी टोळी उघडकीस आलेली असणे, हा केवळ आर्थिक घोटाळा नसून सरकारी यंत्रणेची हुबेहूब नक्कल करून एक 'समांतर प्रशासकीय व्यवस्था' उभी करण्याचा धक्कादायक प्रकार असणे, या टोळीने पुणे महानगरपालिकेचे लेटरहेड, बनावट शिक्के आणि प्रशासकीय भाषेचा इतक्या अचूकपणे वापर केलेला असणे की सर्वसामान्य नागरिकाला फरक ओळखणे अशक्य असणे, उमेदवारांना केवळ नियुक्तीपत्रच नव्हे, तर बदल्यांचे आदेश, पदोन्नती आदेश, पगार पावत्या, सेवा पुस्तके आणि ओळखपत्रेही दिलेली असणे, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे 'समुपदेशन बदली संमती पत्र' अत्यंत शिताफीने तयार करून दिलेले असणे, तसेच खाजगी क्षेत्रासाठी पॅनकार्ड, आधार कार्डही बनावट दिले जात असणे, एका उमेदवाराकडून तब्बल ४५ लाख रुपये उकळले गेलेले असणे, दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी पोलिसांकडे ३ सूत्रधारांच्या विरोधात तक्रार दाखल करूनही कारवाई झालेली नसणे, यामुळे वरिष्ठ

अधिकाऱ्यांचा याला पाठिंबा असल्याचा संशय असणे, तरी या समांतर सरकार चालवणाऱ्या टोळीची शासनाने तात्काळ उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशी करणे, आरोपींवर व अधिकाऱ्यांवर कठोर फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि तरुणांना न्याय देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्रांसह नाशिक महानगरपालिकेमध्ये महसूल व वन विभाग मंत्रालय यांचेकडील परिपत्रक क्रमांक एन.ए.ए १०८०/ल-२, दिनांक २२ मे, १९८१ नुसार महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रांमध्ये स्थानिक विकास प्राधिकरणाकडून पोटविभागणी करण्यास "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करुन घेऊन पोट विभागणी करणे बंधनकारक असतांनाही परिपत्रकाचे उल्लंघन करुन महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात जमिनीची पोट विभागणी करण्यास ना हरकत प्रमाणपत्र न घेता जमिनीची पोटहिस्सा मोजणी करुन जमिनीचे ४००० चौ.मी. च्या आत पोटहिस्से, बेकायदेशीर भूमी अभिलेख विभागाने केलेला महाघोटाळा तसेच पोटहिस्से, नकाशे वेगळे करुन, ७/१२ वेगळे करुन महानगरपालिकेकडून वेगवेगळे ले-आऊट प्रमाणित करुन सन २०१३ पासून महाराष्ट्रातील ज्या महानगरपालिका क्षेत्रात तसेच नाशिक महानगरपालिका हद्दीत १० लाख पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ठिकाणी म्हाडा २० टक्के क्षेत्र १० टक्के ओपन स्पेस व ५ टक्के सुविधा क्षेत्र नाहीसे करण्यात आल्याचे समोर येणे, पोटहिस्से, नकाशे वेगळे करुन, ७/१२ वेगळे करुन महानगरपालिकेकडून वेगवेगळे ले-आऊट प्रमाणित करुन सन २०१३ च्या नियमानुसार, सन २०१७ च्या डीसीपीआरनुसार, युडीसीपीआरनुसार तसेच म्हाडा २० टक्के क्षेत्र, १० टक्के ओपन स्पेस व ५ टक्के सुविधा क्षेत्र नाहीसे करुन सर्वसामान्य जनतेला घरापासून, खुल्या जागेपासून, सुविधांपासून वंचित ठेवण्यात येणे, सदर महाघोटाळा विकासक, अधिकारी, कर्मचारी, तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महानगरपालिकेतील नगररचना विभागातील अभियंते यांच्या संगनमताने शासनाची व सर्वसामान्य जनतेची फसवणूक करुन होत असलेल्या घोटाळ्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन एमआरटीपी माहे ऑक्टोबर, १९६६ नुसार प्रमाणित केलेले सर्व बेकायदेशीर ले-आऊट रद्द करुन यात दोषी असणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबत करावयाची कार्यवाही."

(३) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, सदाशिव खोत, अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील अटल सेतू पुलावरून पुण्यातील एका तरुणाने थेट समुद्रात उडी मारून आत्महत्या केल्याची घटना माहे जून, २०२६ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे अटल सेतूच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला असणे, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी शोध मोहीम सुरू केलेली असून या शोध मोहिमेचा अहवाल शासनाने देण्याची आवश्यकता असणे, अटल सेतूवरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असताना अशी घटना घडल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त करण्यात येत असणे, अटल सेतूच्या संपूर्ण महामार्गाला सुरक्षाविषयक सर्व उपाययोजना करून पुलाच्या दोन्ही बाजूने उंच बॅरिकेट्स बसवणे गरजेचे झालेले असणे, तसेच अटल सेतू वरून आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधण्यासाठी ठिकठिकाणी मोबाईल कॉल सेंटर किंवा पूर्वी मुंबई-पुणे हायवेवर पीसीओ बसविण्यात आले होते त्याच प्रकारची व्यवस्था करणेही गरजेची असणे, यापुढे अटल सेतूवरून समुद्रात उड्या मारण्याची घटना घडू नये यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये मागील अनेक वर्षापासून संगणक परिचालक खासगी कंपनीद्वारे कार्यरत असणे, संगणक परिचालक हे पद ग्रामपंचायत स्तरावरील अतिशय महत्त्वाचे पद असणे, मात्र सद्य:स्थितीत परिचालकांना मिळणारे मानधन हे इतके तुटपंजे आहे की त्यावर उदरनिर्वाह करणे त्यांच्यासाठी कठीण होणे, सदरहू गंभीर विषयावर दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी मंत्री महोदयांच्या उपस्थितीत चर्चा होणे, त्यात संगणक परिचालकांची नियुक्ती कोणत्याही कंत्राटी खासगी कंपनीद्वारे न देता त्यांचे 'ग्रामपंचायत सहाय्यक' असे पदनाम करून त्यांना किमान २० हजार रुपये मानधन सुरु करण्यावर चर्चा होणे, या मागणीला वर्ष होऊनही शासनाने कार्यवाही न करणे, त्याच बरोबर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व पेन्शन लागू करण्याबरोबरच उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात येऊन अनुकंपा धोरणानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वर्ग ३ व ४ पदावर भरती तसेच ३ वर्षांपासून बंद भरती प्रक्रिया सुरु करण्याच्या व यावलकर समितीच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायत आकृतीबंध सुधारण्यात येण्यासंबंधीचे निवेदन दिनांक २० जून, २०२६ रोजी उप मुख्यमंत्री महोदयांना देण्यात येणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(५) **श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरातील सर जे. जे. महानगर रक्तपेढीमार्फत चिंचपोकळी येथील मित्र मंडळाच्या माध्यमातून आयोजित रक्तदान शिबिरामध्ये संकलित करण्यात आलेल्या एकूण ७७ रक्त पिशव्यांपैकी सुमारे ५० ते ५५ रक्तपिशव्या बदलापूर येथील "माया रक्तपेढी" या खाजगी रक्तपेढीकडे पाठविण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, सरकारी रक्तपेढीत संकलित झालेले रक्त कोणत्याही पूर्वपरवानगी शिवाय खाजगी रक्तपेढीकडे वर्ग करणे ही अत्यंत गंभीर व बेकायदेशीर बाब असणे, सदर प्रकरणी राज्य रक्त संक्रमण परिषद (SBTC) यांनी खाजगी केंद्रास बेकायदेशीररीत्या देण्यात आलेल्या ५० रक्त पिशव्यांच्या प्रक्रिया शुल्कापोटी (रुपये १,१००/- प्रति पिशवी) एकूण रुपये ५५,०००/- इतके संबंधित कर्मचाऱ्याकडून वसूल करण्याचे आदेश देणे, त्याचबरोबर मागील तीन वर्षांतील विविध रक्तदान शिबिरांमध्ये प्रत्यक्ष संकलित झालेल्या रक्त पिशव्यांची संख्या आणि सर जे.जे.महानगर रक्तपेढीच्या नोंदींमध्ये दर्शविलेल्या संख्येमध्ये मोठी तफावत समोर येणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाचे स्वतंत्र व सखोल लेखापरीक्षण (Audit) करण्याची मागणी होणे तसेच थॅलेसेमिया, हिमोफेलिया, सिकलसेल ॲनिमिया यांसारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना नियमित रक्ताची आवश्यकता असून अनेक रुग्णांकडे वैध रक्तदाते कार्ड (Donor Card) असतानाही रक्तपेढीतील काही कर्मचारी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी उद्धटपणे वागत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असणे, शासकीय रक्तसाठ्याचा गैरवापर, आर्थिक अनियमितता, रुग्णांची होणारी आर्थिक व मानसिक पिळवणूक आणि रक्तपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी तात्काळ दूर करण्याची आवश्यकता व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सात : सन २०२६-२०२७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस) खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१)** मुख्यमंत्री

**२)** उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)]

**३)** उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्य मंत्री

**४)** वने मंत्री

**५)** पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

**६)** शालेय शिक्षण मंत्री

**७)** उद्योग, मराठी भाषा मंत्री

**८)** पणन, राज्यशिष्टाचार मंत्री

**९)** पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री

**१०)** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

**११)** अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री

**१२)** वस्त्रोद्योग मंत्री

**१३)** रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री

**१४)** मदत व पुनर्वसन मंत्री

**१५)** कामगार मंत्री

**१६)** सहकार मंत्री

**आठ : शासकीय विधेयक –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज *ऊर्फ* बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**नऊ : श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री अशोक *ऊर्फ* भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, सुधाकर अडबाले, मिलिंद नार्वेकर, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, धीरज लिंगाडे, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"मराठी माध्यमांच्या शाळा बंद होणे, शिक्षक मंजूरीचे निकष आरटीई कायद्या विरुध्द असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतील अनागोंदी कारभार, मुंबई

महानगरपालिकेने नालेसफाई केली नसल्यामुळे पहिल्याच पावसात जनता बेजार होणे, किरकोळ महागाईचा दर माहे मे, २०२६ मध्ये ३.९३ टक्के असून त्यामध्ये वाढ होणे, अन्न धान्य महागाईचा दर ४.७८ टक्क्यापर्यंत वाढल्याचा फटका कष्टकरी व अल्प उत्पन्न गटातील लोकांना बसणे, इंधन दर वाढीमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त होणे, महागाईचा सर्वात जास्त फटका सर्वसामान्य जनता व मध्यमवर्ग नोकरदार यांना बसणे, ग्रामीण भागातील रस्त्यांचा दर्जा निकृष्ट असताना रस्त्यात मोठ मोठे खड्डे पडणे, निकृष्ट डांबरीकरणामुळे अपघाताचे प्रमाण वाढणे, रुग्णांना रुग्णालयापर्यंत नेणे कठीण होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

**(१) सर्वश्री अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"गडचिरोली हा राज्यातील अतिदुर्गम, आदिवासीबहुल, पेसा क्षेत्रात समाविष्ट व नक्षलग्रस्त जिल्हा असून भौगोलिकदृष्ट्या दुर्गम परिस्थितीमुळे इतर जिल्ह्यांच्या तुलनेत उच्च शिक्षणाचा अपेक्षित विकास झालेला नसणे, गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बहुतांश महाविद्यालये विनाअनुदान तत्त्वावर कार्यरत असल्याने शिक्षणाचा दर्जा, पायाभूत सुविधा व गुणवत्तापूर्ण मनुष्यबळावर प्रतिकूल परिणाम होत असणे, पेसा क्षेत्रातील गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालयांना विशेष बाब म्हणून अनुदान देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, महाविद्यालयीन शिक्षकांसाठी आवश्यक असलेले ओरिएंटेशन, रिफ्रेशर, शॉर्ट टर्म कोर्स, संशोधन प्रशिक्षण व शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी कार्यक्रम राबविण्यासाठी गोंडवाना विद्यापीठात स्वतंत्र ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर (HRDC) उपलब्ध नसल्याने शिक्षकांना इतर विद्यापीठांवर अवलंबून राहावे लागत असणे, तसेच गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील २०० हून अधिक महाविद्यालयांचे प्रशासकीय व वेतनविषयक कामकाज नागपूर येथील सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयामार्फत चालविला जात असल्याने सिरोंचा, भामरागड, अहेरी, एटापल्ली यांसारख्या दुर्गम तालुक्यांतील महाविद्यालये व कर्मचाऱ्यांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे गडचिरोली किंवा चंद्रपूर येथे स्वतंत्र सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालय स्थापन करण्याची आवश्यकता असणे, याशिवाय दिनांक १ जानेवारी, १९९४ ते ११ जुलै, २००९ या कालावधीत सेवेत असलेल्या एम.फिल. अर्हताधारक प्राध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) चे लाभ मंजूर करण्याबाबत प्रकरणे प्रलंबित असणे, उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांना विशेष अनुदान देणे, गोंडवाना विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील रिक्त

पदे भरणे, विद्यापीठात स्वतंत्र HRDC स्थापन करणे, गडचिरोली/चंद्रपूर येथे स्वतंत्र सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालय सुरू करणे तसेच एम.फिल. अर्हताधारक प्राध्यापकांना CAS चे लाभ मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री सत्यजित तांबे, विक्रम काळे, किशोर दराडे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील सामान्य जनतेला दर्जेदार व मोफत आरोग्य सुविधा पुरविण्याच्या बाबतीत शासकीय यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरली असणे, 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' यांसारख्या योजनांचा मोठा गाजावाजा केला जात असला तरी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या अहवालाने या योजनांची सद्य:स्थिती निदर्शनास येणे, शासकीय रुग्णालयांमध्ये अपुरा कर्मचारी वर्ग, औषधांचा तुटवडा आणि वेळेवर उपचार न मिळणे यामुळे राज्यातील सुमारे ८० टक्के रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचारांसाठी जावे लागत असणे, विमा योजना लागू असूनही खासगी रुग्णालये 'पॅकेजबाहेरचे उपचार' असे सांगून गरिबांची आर्थिक लूट करत असणे, राज्यात विमा योजनांच्या प्रिमियमपोटी कोट्यवधी रकमेचा शासकीय निधी खर्च होत असणे, परंतु त्याचा लाभ केवळ ८.५ टक्के रुग्णांनाच मिळत असणे, हा प्रशासकीय निष्काळजिपणा आणि सार्वजनिक निधीचा अपव्यय असणे, उपचार महाग झाल्याने आजारपणामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी झाली असणे, त्यामुळे शासनाने केवळ कागदोपत्री विमा योजनांवर अवलंबून न राहता शासकीय रुग्णालये सक्षम करण्यासाठी धोरणात्मक पावले उचलून राज्यात 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' ह्या योजनांची अंमलबजावणी होत नसून आरोग्य व्यवस्थेचे मोठ्या प्रमाणावर खासगीकरण झाल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना आर्थिक भार सहन करावा लागत असून त्याकरिता गरिबांची लूट करणाऱ्या रुग्णालयांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन सदर प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २८ जून, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.